**कारणे दाखवा नोटिस**

कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/प्र.क्र.०१/1125/फलो-४
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५, दि. ~~ऑक्टोबर,२०१८~~ 15 नोव्हेंबर 2018
ई मेल आय डी customercare@kisanirrigation.com

**विषय** : विक्री पश्चात सेवा केंद्रांवरील कंपनी नियुक्त अधिकारी/ कर्मचाऱ्याची माहिती चुकीची सादर केल्याबाबत...

कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र. कृआआ-२०१८/ प्र.म.कृ.सिं.यो./ कंनोंनुक/ भाग-१/ प्र.क्र.०१/२०९१/ फलो-४, दि.३० जून २०१८ सोबतच्या परिशिष्ट- १ मध्ये समाविष्ट केलेल्या १२ ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नुतनीकरणास, सन २०१८-१९ साठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. परिशिष्ट-१ मधील अनु क्र.०२ वर मे. किसान इरिगेशन ॲण्ड इनफ्रास्ट्रक्चर लि.टेक्स सेंटर, एल-विंग, तिसरा मजला, चांदीवली रोड, साकी विहार रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-७२ यांना स्तंभ क्र.८ मध्ये नमुद केल्यानुसार राज्यातील एकूण २६ जिल्हयांसाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

आपले कंपनीचे दिनांक ०३/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कंपनीने विनंती केल्यानुसार मूळ आदेशातील स्तंभ क्र.८ मधील मंजूर २६ जिल्हयांमध्ये कंपनीने मागणी केलेल्या ०३ जिल्हयांची भर घालून कृषि आयुक्तालयाकडील भरपत्र-आदेश क्र.कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/भाग-१/प्र.क्र.०१/७३७/फलो-४, दि.३० जुलै २०१८ रोजीच्या भरपत्रानुसार एकूण २९ जिल्हयांमध्ये मान्यता प्रदान करणेत आली आहे.

आपले कंपनीचे दिनांक १३/०८/२०१८ रोजीच्या विनंती अर्जाद्वारे आपले कंपनीने भरपत्र-१ मधील मंजूर २९ जिल्हयांमध्ये ०५ जिल्हयांची भर घालून एकूण ३४ जिल्हयांमध्ये ठिबक व तुषार सुक्ष्म सिंचन योजनेचे काम करण्यास मान्यता मिळणे बाबत पुनःश्च विनंती केली आहे.

उपरोक्त जिल्हेवाढीसाठी आपण सादर केलेल्या विनंती अर्जासोबत सहपत्रित केलेला कंपनी नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांचा तपशील पडताळणीसाठी खालीलप्रमाणे नमूद दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकांवर संपर्क साधला असता प्राप्त झालेली माहिती व प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये पुढील प्रमाणे तफावत निदर्शनास आली आहे.

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नाव | वेळ | संबंधितांकडून दूरध्वनी द्वारे प्राप्त तपशील (प्रत्यक्ष वस्तुस्थिती) | संबंधित कर्मचाऱ्याचा कंपनीने सादर केलेला तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | अे.बी.पाटील<br>८६९१०७६३४५ | १०.४५ | राजेंद्र थोरात/**बी.ए.**/<br>४ महिन्यांपासून कार्यरत.<br>नाशिक | **बी.टेक.ॲग्रि** ३/प<br>सोलापूर |
| २ | दिपक चोपडा<br>८८८४४९०५२ | ११.१० | **चुकीचा नंबर** दिला आहे.<br>(कन्नड भाषिक व्यक्तीचा) | बी.एस.सी.<br>बीड,लातूर |

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचा-याचे नाव | वेळ | संबंधितांकडून दूरध्वनी द्वारे प्राप्त तपशील (प्रत्यक्ष वस्तुस्थिती) | संबंधित कर्मचाऱ्याचा कंपनीने सादर केलेला तपशील |
|---|---|---|---|---|
| ३ | गणेश चव्हाण<br>८६९१०७६५४८ | ११.१२<br>१६.०५ | **फोन बंद** आहे.<br>--//--//-- | बी.टेक ॲग्रि ३/प<br>जालना,परभणी |
| ४ | एन.के.ठाकूर<br>८६९१०७६५२५ | ११.५० | **बी.ए.**/५ वर्षे<br>औरंगाबाद,जालना | **बी.एस.सी.**३/प<br>यवतमाळ, अमरावती |
| ५ | सोपान घुमे<br>८६९१०७६५२० | ११.५५ | **एम.कॉम,एम.बी.ए.**/२४ वर्षे<br>सोलापूर, उस्मानाबाद | **बी.एस.सी.** ३/प<br>नागपूर, चंद्रपूर |
| ६ | मोहम्मद जाहेद<br>८६९१०७६५४२ | १२.१० | आयडिया **नं.अस्तित्वात नाही.** | बी.एस.सी. ३/प<br>भंडारा, वर्धा |
| ७ | प्रविण पवार<br>८६९१०७६५०५ | १२.२० | **बी.ए.एम.बी.ए.**/१ वर्षे पासून<br>जळगांव, धुळे | **बी.एस.सी.ॲग्रि.** ५/प<br>नाशिक,धुळे |
| ८ | जयेश रामावत<br>८६९१०७६५२१ | १२.४० | **डी.ई.ई.** सामलवाडी तुळजापूर | **बी.एस.सी.ॲग्रि.** ५/प<br>नाशिक,धुळे |
| ९ | गिरीश संघवी<br>८६९१०७६५३८ | १२.३० | **बी.ए.**/४ वर्षे<br>नाशिक,परभणी | **बी.एस.सी.** ५/प<br>पालघर |
| १० | अनिल झा<br>८६९१०७६५३४ | १२.५५ | **बी.कॉम.**/१८ वर्षांपासून कार्यरत<br>ठाणे, पालघर | **बी.एस.सी.** ५/प<br>मुंबई उपनगर |
| ११ | विवेक सोलट<br>८६९१०७६५४९ | १२.४० | **बी.कॉम.**/१८ वर्षांपासून कार्यरत<br>मुंबई उपनगर | **बी.एस.सी.** ५/प<br>मुंबई उपनगर |

उपरोक्त नुसार जिल्हेवाढीसाठी आपण कृषि आयुक्तालयास सादर केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यामुळे आपले कंपनीस दिलेले नूतनीकरणाचे आदेश रद्द का करणेत येऊ नयेत याबाबतचा खुलासा सदरची नोटिस मिळालेपासून १० दिवसांच्या आत सादर करावा. अन्यथा खुलासा सादर न केलेस नियमा नुसार पुढील कार्यवाही करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-५

प्रति,

**मे. किसान इरिगेशन ॲण्ड इनफ्रास्ट्रक्चर लि.**
**टेक्स सेंटर,एल-विंग,तिसरा मजला,चांदीवली रोड,**
**साकी विहार रोड, अंधेरी (पश्चिम),मुंबई-७२**